# कात्रज घाट डांबरीकरणाचे काम अर्धवट

▸ वार्ताहर

खेड शिवापूर, दि. ९ : कात्रज घाट रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम अर्धवट झाले असून, खड्डेमय रस्त्यामुळे टायर पंक्चर होत असल्याने दुचाकीस्वार प्रवासी त्रस्त झालेले असून, रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

कात्रज घाट व बोगद्यातील रस्त्याची दुर्दशा झाल्याने तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ लांडगे यांनी शिवसेनेच्या माध्यमातून रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यानंतर संबंधित अधिकारी यांच्यात व शिवसैनिक कार्यकर्त्यांच्या बैठकीतील निर्णयानुसार कात्रजच्या नवीन बोगद्यातून वाहतूक वळवून कात्रज घाटातील रस्त्याचे खड्डे डांबरीकरणाने बुजवून खराब रस्त्याचेही खडीकरण करण्यात आले होते. रस्ता खडबडीत झाल्याने व रस्त्यावरील खडी हटली न गेल्याने दुचाकी पंक्चर होऊन नादुरुस्त होत असे. घाट रस्त्यावर कारपेट (बारीक खडीने डांबरीकरण) व्हावे म्हणून लांडगे यांनी संबंधितांना दिलेल्या निवेदनाद्वारे मागणी करून पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला होता; परंतु निवडणुका आल्याने हे आंदोलन पुढे ढकलण्यात आले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी लांडगे यांच्या पत्राची दखल घेऊन कात्रज घाट रस्त्याचे (कारपेट) बारीक डांबरमिश्रित खडीने डांबरीकरण केले; परंतु हे काम घाटातील मोठ्या वळणापर्यंतच अर्धवट करण्यात आले. तर बोगद्यातील रस्त्याचीही दुरवस्था झाली आहे. दुचाकीस्वारांना बोगद्यातील रस्ता ओलांडताना कसरत करावी लागत आहे. तर घाट रस्त्याचे काम अर्धवट झाल्याने दुचाकीस्वार त्रस्त झाले आहेत.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.